# इस्राएल

## पुरन्दरे चन्द्रशेखर

इस्राएल सरकारने सुप्रीम कोर्टाच्या स्वायत्ततेवर गदा आणण्याचा प्रस्ताव मांडला आहे. तेथे गेले काही महिने त्यावरून सार्वजनिक असंतोष खदखदत आहे. लाखोंनी लोक रस्त्यावर येऊन सरकारविरोधी निदर्शने करत आहेत. हा प्रस्ताव व त्यामागचे इस्राएल देशांतर्गत अनेक प्रवाह आपल्याला तितकेच प्रस्तुत आहेत. म्हणून त्यांची दखल घेणे उद्बोधक ठरावे. भारताशी काही साम्ये अशी – प्रतिगामी विरुद्ध पुरोगामी विचारसरणी. बहुजिनसी समाज. ज्यू–मुस्लिम हा दृश्य भेद, पण ज्यू धर्मीयही एकजिनसी नाहीत. त्यांच्यातील टोकाचे धार्मिक गट व सहिष्णु गट यांच्यात सतत तणाव असतात. धार्मिक गटांमध्येही अनेक उप–प्रवाह कमी अधिक तीव्रतेचे आहेत. ते आपापला मर्यादित कार्यक्रम बृहत्समाजावर लादण्याचा प्रयत्न करतात. देश म्हणून इस्राएल विकसित मानला जातो पण गरीब–अतिगरीब आणि मध्यमवर्ग–श्रीमंत यांच्यात दरी आहे. या घटकांबरोबर २० टक्के जनता अरब–मुस्लिम आहे. ते आणि बहुसंख्य ज्यू यांच्यात हिंसक संघर्ष चालू असतात.

### वर्तमान निषेध

प्रथम सध्याचे निषेध कशासाठी हे पाहू. आजवर सुप्रीम कोर्टाला संसदेने मान्य केलेला एखादा कायदा रद्द करण्याचा अधिकार आहे. नव्या प्रस्तावानुसार हा अधिकार रद्द होईल म्हणजे सरकारवर अंकुश रहाणार नाही. कोर्टाचा निर्णय संसद बहुमताने नाकारू शकेल. तसेच, नव्या न्यायाधीशांची नेमणूक एक समिती करेल. अर्थातच या समितीचे सदस्य सरकारला अनुकूल असणारेच असतील. आपले कायदामंत्री रिजिजू यांनी अशीच भूमिका घेतली आहे. न्यायाधीश निवडून येत नाहीत. त्याआधी 'सामाजिक बांधिलकी' असणारी न्यायव्यवस्था असावी असा एक विचारप्रवाह इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत पुढे आला होता. अल्पसंख्यांकांचे हक्क शाबूत राहण्यासाठी स्वतंत्र न्यायसंस्था आवश्यक असते. अन्यथा बहुसंख्यशाही ते हक्क मानणार नाही, तुर्कस्तान, हंगेरी व पोलंडचे उदाहरण प्रस्तावाचे विरोधक देतात. या देशांनी न्याय संस्थेवर बंधने आणली, परिणामत: तेथे लोकशाहीच्या नावाखाली निर्वाचित हुकूमशाही आली आहे. इस्राएल याच मार्गाने जाईल.

### सरकारी प्रस्ताव

इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे इस्राएलची राज्यघटना किंवा संविधान लिखित नाही. १९४८ ला इस्राएल अस्तित्वात आल्यापासून मूलभूत कायदे आणि अधिकार तयार होऊ लागले. हे देशाचे संविधान. सरकारच्या मते कोर्ट संदिग्ध कायद्यांचा मनमानी अर्थ लावते आणि स्वत:कडे सत्ता खेचून घेते. ही न्यायसंस्थेची हुकूमशाही आहे. तिला आळा घालायचा असेल तर कोर्टाच्या अधिकारांवर मर्यादा आली पाहिजे. म्हणून हा प्रस्ताव. पण या प्रस्तावामुळे निर्वाचित सरकारची सत्ता अमर्यादित राहील हा विरोधकांचा आक्षेप आहे. सत्तेचा संभाव्य गैरवापर हा आक्षेपाचा प्रमुख मुद्दा. इस्राएलच्या संदर्भात हा गैरवापर अनेक प्रकारे होऊ शकतो. ज्यांचे राष्ट्रप्रेम त्यांच्या व्याख्येनुसार नसेल, अशा विरोधकांची मुस्कटदाबी अतिरेकी संघटना 'खऱ्या' राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली करू शकतात. गैरसोयीच्या सामाजिक संघटनांचा जाच सरकार करू शकते. लष्कर, पोलिस यांना एखादा राजकीय नेता आदेश देऊ शकतो आणि तो पाळणे त्यांच्यावर बंधनकारक रहाते. हा आदेश एरवी अन्याय्य ठरला असता. सरकार स्वत:च्या तत्कालीन सोयीचे कायदे करू शकते, ते दीर्घकाळासाठी सम्यक समाजाच्या हिताचे असतीलच असे नाही.

### अंतर्गत संघर्ष

अरब आणि ज्यू यांच्यातील संघर्ष तर इस्राएलच्या स्थापनेपासून आहे. पण ज्यूंच्यामध्येही कट्टर, पोथीनिष्ठ ज्यू आणि उदारमतवादी, धर्माला दैनंदिन आयुष्यात तितके महत्त्व न देणारे किंवा निधर्मी ज्यू यांच्यातील ताणही तेव्हापासून वाढत आलेले आहेत. आजवर ते संघर्ष दबलेले राहिले पण मागच्या वर्षीच्या निवडणुकांत कोणत्याच पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही.

निवडणुकीत विविध तीव्रतेच्या कट्टरपंथीय पक्षांना संसदेत जास्त जागा मिळाल्या. मग अनेक पक्षांच्या आघाडीचे सरकार आले. कट्टर पंथीय मंडळींच्या मते आजवर देश कसा चालावा हे राजकीय पक्ष ठरवत नाहीत तर कोर्ट ठरवते. ज्यू समाजाची विशिष्ट मूल्ये, अधिकार कोर्ट नाकारते म्हणून कोर्टाला आवरा. कट्टरपंथीय लोकसंख्येच्या तेरा टक्के आहेत. पण त्यांच्या प्रजननाची वाढ इतर ज्यूंपेक्षा, विशेषत: निधर्मी ज्यूंच्या तुलनेत तिप्पट आहे. त्यामुळे २०५० पर्यन्त ते लोकसंख्येच्या २६ टक्के होतील असा अंदाज आहे. १९९९ ला सुप्रीम कोर्टाने स्थानिक धार्मिक संघटनांत पुरोगामी विचारसरणीच्या ज्यूंचा समावेश करावा असा आदेश दिला. तेव्हा अडीच लाखांहून अधिक कट्टर ज्यूंनी त्याविरोधी निदर्शने केली. असाच एक आदेश देऊन कोर्टाने या लोकांच्या सभा–संमेलनांना सरकारी मदत मिळू नये असा निर्णय दिला कारण त्या सभांत पुरुष व स्त्रिया यांना पोथीनिष्ठ ज्यू धर्मानुसार अलग बसवण्यात येते. ही प्रथा पोथीनिष्ठ इस्लामसारखीच! २०२१ ला सुप्रीम कोर्टाने धर्मांतरात हस्तक्षेप केला. ज्यू धर्माच्या काही विशिष्ट पंथाचे अनुयायी ज्यू समजावेत व हे धर्मांतरित ज्यू इस्त्राएलचे नागरिक होऊ शकतात असा निर्णय दिला. कट्टर पंथीय या निर्णयाच्या कडाडून विरोधात आहेत. या पार्श्वभूमीवर, सत्तेच्या जवळ येताच ते आता सुप्रीम कोर्टावर कुरघोडीचा प्रयत्न करत आहेत. आघाडी सरकारमध्ये येण्याची त्यांची पूर्वअट अशी होती – संसद कोर्टाचा निर्णय रद्द करू शकेल असा कायदा नवीन सरकारने करावा.

### प्रस्तावाचे विरोधक

सरकारने प्रस्तावाचे कायद्यात रूपांतर केले तर कट्टरपंथीय देश ताब्यात घेतील अशी विरोधकांची निश्चित धारणा आहे. विरोधक कोण आहेत हे पहाण्यासारखे आहे. आरोग्यसेवेतील कर्मचारी, विद्यार्थी हे संघटित वर्ग एरवीही राजकीय दृष्ट्या जागृत व सक्रिय असतात. ते प्रस्तावच्या विरोधात उभे आहेत. पण इस्त्राएलचे वैशिष्ठ्य म्हणावे लागेल की या गटांना अनपेक्षित पाठिंबा दोन वर्गांकडून मिळाला आहे. आजवर मध्यमवर्ग सामान्यत: आणि लष्कर विशेषत: राजकारणापासून अलिप्त असे. कट्टरपंथीय धोरणाच्या विरुद्ध ते वर्ग आता राजकारणात सक्रिय झाले आहेत.

तसेच, एकूणच उद्योग क्षेत्राला राजकीय स्थैर्य आवश्यक असते. इस्त्राएलचे IT (माहिती तंत्रज्ञान) वरील प्रभुत्व जागतिक उत्तम दर्जाचे आहे. त्या क्षेत्रात देशाच्या एकूण नोकरदारांपैकी दहा टक्के लोक आहेत. त्यांची कमाई चांगली आहे. जागतिक स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी या क्षेत्राला देशाची अस्थिरता हा धोका आहे. कारण देश अस्थिर आहे असे चित्र जगात निर्माण झाल्यास परदेशी गुंतवणूक आटते, आंतरराष्ट्रीय व्यापार मंदावतो. म्हणून IT क्षेत्र प्रस्तावाच्या ठाम विरोधात आहे.

सुप्रीम कोर्टावरचे प्रस्तावित निर्बंध आज देशाला दुभंगत आहेत. निर्बंध हवेत असे आग्रही धर्मनिष्ठ तर निर्बंध नकोत या मताचे पुरोगामी. दोन्ही बाजू आक्रमक होत आहेत. अशी परिस्थिती आंतरराष्ट्रीय उद्योगाला अनुकूल नसते. तर प्रस्तावाच्या समर्थकांच्या मते तंत्रज्ञ वर्ग अवाजवी महत्त्व मिळालेला लब्धप्रतितिष्ठित वर्ग आहे आणि दमदाटी करत आहे.

IT क्षेत्राची प्रस्तावाविरुद्ध जी भूमिका, तीच लष्कराची. हजारो वैमानिकांनी व अधिकाऱ्यांनी प्रस्तावाविरुद्ध लेखी मत नोंदवले आहे. संशयास्पद आदेश आम्ही पाळणार नाही, या प्रस्तावित संसदीय हुकूमशाहीला आमचा विरोध आहे असे लष्कराचे म्हणणे. हा इस्त्राएलला मोठा धक्का आहे कारण IT क्षेत्र सरकारी तिजोरीत भर घालते तर लष्कर त्या अशांत प्रदेशात देश सुरक्षित राखते.

या दोन्ही वर्गांचे देशाच्या एकूण वर्गव्यवस्थेतील स्थान पहाण्यासारखे आहे. दोन्ही वर्ग संपन्न आहेत. पण देशात २० टक्केहून जास्त नागरिक दारिद्र्यरेषेखाली आहेत. त्यातही एक–तृतीयांश अरब–इस्त्राएली गरीब आहेत तर कट्टरपंथीय ५० टक्के गरीब आहेत. म्हणजे, कट्टरपंथीय प्रस्तावाला का अनुकूल आहेत , त्याचा एक खुलासा मिळतो. वर्गव्यवस्था– जहाल हिंदुत्ववाद यांचे नाते तपासण्यासारखे आहे. इस्त्राएलमध्ये कट्टर पंथीय सैन्यातही अत्यल्प असतात, त्यांच्यातील स्त्रिया जवळजवळ नसतातच.

### संवैधानिक पेच

या संघर्षामुळे देशांत संवैधानिक प्रश्न निर्माण झाला आहे आणि तो चिघळण्याची शक्यता आहे. कायदामंत्र्याच्या दबावाखाली इस्त्राएलच्या पोलिस कमिशनरने नुकतेच तेल अविव

शहराच्या पोलिस कमिशनरला काढून टाकले कारण तो सार्वजनिक विरोधकांबाबत 'मवाळ' होता. पण देशाच्या सर्वोच्च विधिअधिकाऱ्याने हा निर्णय रद्द ठरवला व तेल अविवच्या कमिशनरला परत कामावर घेतले. यापुढे जर सर्वोच्च न्यायालयाने पंतप्रधानाने केलेला कायदा अमान्य केला तर नोकरशाही किंवा लष्कर कोणाचा आदेश मानणार?

### पुरोगामी दुटप्पीपणा

इस्राएलची लोकशाही या प्रस्तावामुळे धोक्यात आहे असे म्हणणारा वर्ग पॅलेस्टाईन, इस्राएली अरब यांच्या लोकशाही अधिकारांबद्दल मूग गिळून आहे हे उल्लेखनीय. एकीकडे त्यांचा दावा असा आहे की कट्टरपंथीय ज्यू देशाला देशप्रेमाच्या नावाखाली भ्रामक राष्ट्रवादाकडे नेत आहेत, त्याचवेळी देशातील अरब याच 'लोकशाही'चे बळी आहेत इकडे त्यांचे सोयीस्कर दुर्लक्ष आहे. या मुद्द्याचेही भारताशी साधर्म्य आहे. उदा. लेख लिहिण्याच्या वेळी – एप्रिल पहिल्या आठवड्यात – जेरुसलेम या ज्यू, ख्रिश्चन आणि मुस्लिम तीनही धर्मांच्या पवित्र ठिकाणी अल अक्सा मशिदीत घुसून इस्राएलच्या पोलिसांनी मुस्लिमांना बदडले. अशा घटनांवर 'पुरोगामी' ज्यू आवाजी निषेध करत नाहीत.

### पडद्यामागचे सूत्रधार

एका वृत्तानुसार, इस्राएली न्यायसंस्थेचे पंख छाटणे हा अमेरिकन डाव आहे. इस्राएलच्या संस्थापकांचा समाजवाद संपवून मुक्त बाजाराचा अमेरिकन आदर्शवाद आणणे हा उद्देश त्यामागे आहे. आणखी एक निरीक्षण असे की इस्राएलच्या भौगोलिक सीमा वाढवण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणजे, गैरमार्गाने हिसकावून घेतलेल्या पॅलेस्टाईनच्या क्षेत्राचा भविष्यात इस्राएलमध्ये कायमचा समावेश करता येईल. मग पॅलेस्टाईन हे राष्ट्र म्हणून कधीच अस्तित्वात येणार नाही.

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk